महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२३/प्र.क्र.४७१/२०२३/जाहिरात दिनांक:- ११ जून, २०२४

## -: शुद्धिपत्रक :-

## इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३३/२०२३)

**समाज कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक ०२४/२०२३) आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३३/२०२३) या दोन्ही संवर्गांची संयुक्त चाळणी परीक्षा ऑफलाईन पध्दतीने अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर, पुणे आणि नवी मुंबई या जिल्हा केंद्रांवर रविवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात येईल.** प्रस्तुत चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील परीक्षा या सदरामधील परीक्षेचा अभ्यासक्रम येथे उपलब्ध आहे. जारिहातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेश प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे परीक्षेपूर्वी उपलब्ध करुन देण्यात येतील.

२. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागातील इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे अंतर्गत **इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब** या संवर्गातील एकूण ३१ पदांच्या भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. जाहिरातीस अनुसरुन दिनांक १९ मे, २०२४ रोजी चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अनुसार प्रस्तुत संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातीकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने आयोगाच्या दिनांक २१ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रस्तुत चाळणी परीक्षा पुढे ढकलण्यात आली असल्याचे जाहीर करण्यात आले होते. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन शासन पत्र, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: आस्थाप्र-२०२२/प्र.क्र.२५/आस्थापना-२, दिनांक १४ मे, २०२४ अन्वये भ.ज.(ब) वर्गवारीच्या समांतर आरक्षणामध्ये बदल करुन तसेच सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गाकरीता पदे आरक्षित दर्शवून शासनाने सुधारित मागणीपत्र पाठविले आहे. त्यानुसार पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे राहील:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०३ | ०३ | ०६ | २२ | ०९ | ३१ |
| सर्वसाधारण | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०२ | ०२ | ०४ | १६ | ०६ | २२ |
| महिला | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ | ०६ | ०३ | ०९ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | एकूण ३१ पदांपैकी - ०१ पद दिव्यांग कर्णबधीरता / ऐकू येण्यातील दुर्बलता करीता आरक्षित | | | | | | | | | | | | |

३. शासनाने पाठविलेल्या मूळ मागणीपत्रानुसार भ.ज.(ब) करीता आरक्षित असलेले ०१ पद भ.ज.(ब)(खेळाडू) करीता आरक्षित असल्याचे कळविले होते. त्यानुसार विज्ञापित जाहिरातीमध्ये भ.ज.(ब) करीता आरक्षित ०१ पद खेळाडूकरीता आरक्षित असल्याचे दर्शविण्यात आले होते. तथापि, शासनाने दिनांक १४ मे, २०२४ रोजीच्या पत्रासोबत पाठविलेल्या सुधारित मागणीपत्रामध्ये भ.ज.(ब)(खेळाडू) करीता आरक्षित ०१ पद रद्द करुन सदरचे पद भ.ज.(ब)(सर्वसाधारण) करीता आरक्षित असल्याचे कळविले आहे. त्यानुसार उपरोक्त विवरणपत्रामध्ये भ.ज.(ब)(सर्वसाधारण) करीता ०१ पद दर्शविण्यात आले आहे. भ.ज.(ब) वर्गवारीतील समांतर आरक्षणामध्ये बदल झाल्याने भ.ज.(ब) वर्गवारीतील अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

४. शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, सदर मूळ जाहिरातीस अनुसरून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

५. काही उमदेवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदीच्या आधारे इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करुन इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक २८ मे, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, अराखीव किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाजून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास, अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा (OBC) दावा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा दावा करण्यास विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

६. प्रस्तुत संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमानुसार अराखीव तसेच मागासवर्ग करीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता आहे:-

Possess a degree of a recognised University, if they belong to the Backward Classess, and a degree in Social Welfare Sciences or Social Work of a recognised University or Institute, Otherwise;

अराखीव व मागासवर्गाकरीता उपरोक्त वेगवेगळी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग उमेदवारांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

७. आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या **इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३३/२०२३)** करीता फक्त अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज केलेल्या उमेदवारांना इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील तसेच भ.ज.(ब) वर्गवारीतील उमेदवारांकरीता नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र १३३/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या "Question" या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग याचा दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग याचा विकल्प सादर केलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) चा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(४) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करण्यासाठी विहित पध्दतीने तसेच विहित कालावधीत विकल्प सादर न करणाऱ्या उमेदवारांचा प्रस्तुत परीक्षेकरीता यापूर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरतीप्रकियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(५) इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणामुळे मागासवर्गीयांकरीता अनुज्ञेय असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीस अनुसरून तसेच शैक्षणिक अर्हतेनुसार नव्याने पात्र ठरणारे उमेदवार तसेच भ.ज.(ब)(सर्वसाधारण) करीता अर्ज करणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र १३३/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे भ.ज.(ब), इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

(६) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवाराने इतर मागास वर्ग किंवा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच भ.ज.(ब), इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातून नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक १२ जून, २०२४ रोजी १४.०० ते<br>दिनांक २६ जून, २०२४ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक २६ जून, २०२४ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक २८ जून, २०२४ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१ जुलै, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

८. **इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३३/२०२३)** या संवर्गाच्या **मूळ जाहिरातीनुसार** कमाल वयोमर्यादा गणण्याचा **दिनांक ०१ एप्रिल, २०२४** असा राहील. तसेच **शैक्षणिक अर्हता गणण्याचा दिनांक मूळ जाहिरातीनुसार** अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच **दिनांक ०१ जानेवारी, २०२४** असा राहील.

९. **इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३३/२०२३)** करीता इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर विकल्प सादर करण्यासाठी विहित अंतिम दिनांकापूर्वीचे म्हणजेच **दिनांक २६ जून, २०२४** पूर्वीचे असणे आवश्यक आहे.

१०. प्रस्तुत संवर्गाकरीता भ.ज.(ब) वर्गवारीचा व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११. उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील. इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३३/२०२३)** च्या मूळ जाहिरातीस व सदर शुद्धिपत्रकास, आयोगाच्या दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदी लागू राहतील.

१२. दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध मूळ जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, (जाहिरात)

ठिकाण: नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग